

पुण्यनगरी

# आरोग्यजागर

| उत्तम आरोग्य | उज्ज्वल भविष्य | | पुणे, मंगळवार, १ सप्टेंबर २०१५




# डेंग्यूचे आव्हान आणि सक्षम होमिओपॅथी





होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

डेंग्यू हा जगातील अनेक भागांमध्ये जलदगतीने पसरत चाललेला संसर्गजन्य रोग आहे. डेंग्यू तापाला हाडे मोडणारा ताप असेही म्हणतात. डेंग्यू जातीचे जीवाणू हे या आजाराचे रोगकारक घटक आहेत आणि एडीस इजिप्ते जातीचे मच्छर हे डेंग्यू पसरवणारे घटक आहेत. या जातीचे मच्छर ताज्या साठलेल्या पाण्यात वाढतात. कुंड्या, नारळाच्या कवट्या, प्लॅस्टिकची भांडी इत्यादी घराच्या अवतीभवती आढळणाऱ्या वस्तूंमध्ये ते वाढतात. त्यांचे चावा घेण्याचे प्रमाण दिवसा जास्त असते. एकदा या मच्छराने अशा डेंग्यूच्या रुग्णाला चावा घेतल्यानंतर त्या मच्छरमध्ये या जीवाणूंचा संसर्ग होऊन लाळग्रंथीमध्ये हे जीवाणू पसरतात. असा मच्छर डेंग्यूचा वाहक बनतो. डेंग्यू हा रक्तघटकांमार्फत, अवयव प्रत्यारोपणाद्वारे तसेच मातेकडून अर्भकाला होऊ शकतो.

**रुग्णांमधील लक्षणे :** डेंग्यू ताप हा कमी-अधिक अशा वेगवेगळ्या तीव्रतेचा असू शकतो.

**१. डेंग्यू ताप** (Dengue Fever) विषाणूचा संसर्ग झाल्यापासून ते अशी लक्षणे उद्भवण्याचा कालावधी ३ ते १४ दिवसांचा असतो. लहान मुलांमध्ये फ्ल्यूसारखी सौम्य लक्षणे, जुलाब, उलट्या होतात. परंतु, गुंतागुंतीचे दुष्परिणाम होण्याची संभावना जास्त असते. डेंग्यूचा ताप अचानक अतितीव्र प्रमाणात येतो. डोकेदुखी, स्नायुदाह, सांधेदुखी चालू होते. डेंग्यूमध्ये हाडेदुखी आणि स्नायुदाह खूप असह्य असतो म्हणून त्याला 'हाडे मोडणारा ताप' म्हणतात. अंगदुखी, अशक्तपणा, अंगावर लाल रंगाचा चट्टा येऊ शकतो.

**२. डेंग्यू रक्तस्राव ताप** (Dengue Hemorrhagia Fever) - हा गंभीर प्रकार असून यात तापाबरोबर बाह्य रक्तस्राव, चट्टे उठणे, हिरड्यांमधून रक्तस्राव, आंत्रामधून रक्तस्राव, मेंदूमध्ये रक्तस्राव इत्यादी लक्षणे दिसून येतात. निरोगी शरीरात रक्तातील प्लेटलेटचे प्रमाण सुमारे दीड ते तीन लाखांपर्यंत असते. या प्लेटलेटमुळे रक्त गोठले जाते व रक्तस्रावास मज्जाव केला जातो. परंतु, डेंग्यूमध्ये या पेशींची संख्या झपाट्याने कमी कमी होत जाते. तसेच शरीरातील केशवाहिन्यांची गळती सुरू होऊन महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा कमी पडतो आणि तो अवयव निकामी होतो. पेशीअंतर्गत पाण्याचे प्रमाण कमी कमी होत जाते आणि रुग्णाचा रक्तदाब कमी कमी होत जातो. अशा वेळेस गरज नसताना रक्तसंक्रमण दिले गेले तर अशी अवस्था वाढू शकते. तसेच छातीत, पोटामध्ये पाणी जमा होऊन श्वसनास अडथळा निर्माण होतो.

**३. डेंग्यू अतिगंभीर आजार** (Dengue Shock Syndrome) - ही डेंग्यू रक्तस्राव तापाचीच पुढची अवस्था असून काही लोकांमध्ये ही दिसून येते. यात रुग्ण अस्वस्थ होतो, थंड पडतो, नाडी मंदावते, रक्तदाब कमी होतो आणि शेवटी मृत्यू ओढावू शकतो.

रोगमुक्तीच्या अवस्थेत शरीरात कमी झालेले पाणी पुन्हा रक्तात ओढून घेण्यात येते. अशा वेळी शरीरात पाण्याचे अतिप्रमाण होऊन मेंदूवर दुष्परिणाम होतात. परिणामी आकडी येणे किंवा बेशुद्ध अवस्था उद्भवते. अतिप्रमाणात थकवा येतो. याचबरोबर Guillian Barre Syndrome हृदयआवरण दाह, लिव्हर फेल्युअर जुनाट स्नायुदुखी उद्भवू शकतो.

**निदान :-** लक्षणांवरून स्थानिक रोगाच्या ठिकाणी या आजाराचे निदान पटकन करता येते. रक्ततपासणीत प्लेटलेटचे प्रमाण, पांढऱ्या पेशींचे प्रमाण खूप कमी होते. लॅब टेस्टमध्ये डेंग्यू जीवाणूंविरुद्ध तयार झालेले रक्तातील प्रतिपिंडे (IgG,IgM) NS1 Antigen ची ताप आल्यावरची तपासणी यावरून खात्रीशीर निदान होते.

**प्रतिबंध -** सार्वजनिक स्वच्छता बाळगणे, सांडपाण्याचा निचरा करणे, डासांचा प्रादुर्भाव रोखणे महत्त्वाचे आहे. डेंग्यू विषाणूतील जनुकात सतत बदल होत असल्यामुळे या आजारावर परंपरागत उपचार पद्धतीमध्ये कुठलेही ठोस औषध नाहीये. प्लेटलेटचे प्रमाण १०,००० पेक्षा कमी झाल्यावर बाहेरून हे प्लेटलेट द्यावे लागतात. परंतु, होमिओपॅथी उपचारांमुळे अशी वेळ येत नाही आणि फक्त योग्य औषधांद्वारे रोगप्रतिकारशक्ती वाढवून प्लेटलेटचे प्रमाण वाढवता येते. होमिओपॅथीमध्ये या आजारावर खूप प्रभावी उपचार आहे. होमिओपॅथिक उपचार हे व्यक्तिसापेक्ष तसेच व्यक्तीचा सर्वांगीण विचार करून केले जातात. त्यामुळे जीवाणू विषाणूंनी स्वतःला वाचवण्यासाठी बदल घडवून आणले तरीही होमिओपॅथी औषधांपुढे ते निष्प्रभ ठरतात. कारण होमिओपॅथिक औषधाने प्रतिकारशक्तीला जीवाणू विषाणूविरोधात कार्य करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते. एकदा हा प्रशिक्षित टप्पा पूर्ण केला की, जगातील कुठल्याही बलाढ्य जीवाणू, विषाणूविरुद्ध लढण्याची क्षमता नैसर्गिकरीत्या वाढते आणि शरीरातील पेशी हे युद्ध सतत जिंकत राहतात.

**केस**

डेंग्यूचे निदान झालेल्या १२ वर्षांच्या मुलीची ही केस आहे. ती दुबईला पोहण्याच्या स्पर्धेसाठी गेली होती आणि तिथून परत येतानाच तिला तीव्र ताप व उलट्या सुरू झाल्या. तपासणीमध्ये तिला डेंग्यू झाल्याचे आढळले. तिची आई एम.बी.बी.एस. डॉक्टर असल्यामुळे त्यांना माहीत होते की, डेंग्यूवर ठोस उपचार नाहीयेत. परंपरागत औषधे घेऊनसुद्धा तिला खूप मोठ्या प्रमाणता ताप येत होता आणि प्लेटलेटचे प्रमाण कमी कमी होत होते. त्यामुळे त्या तिला माझ्याकडे घेऊन आल्या.

**तक्रारी :-** १. ताप येणे ८ दिवसांपासून - अचानक तीव्र ताप (१०१ अंश) येणे. त्यानंतर खूप उलट्या होणे. उलटीमध्ये खाल्लेले अन्न बाहेर पडणे. सतत डोकेदुखी एका आठवड्यापासून. ३. खूप थकवा आणि अशक्तपणा जाणवणे. ४. भूक खूप कमी लागणे. ५. तळव्यांवर खाज दुपारच्या वेळी येणे. तळवे लालसर होणे.

**विशेष माहिती :-** १. थोड्या-थोड्या वेळाने तहान लागणे. २. खाण्यात गोडाची, थंड पेयांची आवड. ३. आंबट पदार्थांची नावड. ४. घशाला कोरड पडणे. ५. थंड प्रकृती.

**स्वभाव :-** सध्या तिचा स्वभाव खूप चिडचिडा झाला आहे. इतर वेळी ती खूप मृदू स्वभावाची, लाजाळू मुलगी आहे. तिला पोहण्याची खूप आवड आहे आणि प्रत्येक पोहण्याच्या स्पर्धेत ती सहभाग घेते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :** १. महत्त्वाकांक्षी. २. सतत ताप येणे. ३. खूप प्रमाणात उलट्यांचा त्रास. ४. अशक्तपणा. ५. तापात थंडी न वाजणे. ६. शरीरात पाणी खूप कमी होणे. ७. खूप तहान लागणे. ८. खाण्यात गोडाची आवड. ९. थंड प्रकृती.

**प्रतिसाद :** औषधांचा प्रतिसाद बघण्यासाठी मी तिला एक दिवसासाठी रुग्णालयात भरती करून घेतले. ३ ते ४ तासांत तिचा ताप उतरला आणि तिला दुसऱ्या दिवशी रक्ताची चाचणी घेऊन परत बोलावले. तिच्या आईने सांगितले की, तिला पुन्हा ताप आला नाही. तिची डोकेदुखी कमी झाली. रात्री तिला शांत झोप आली आणि तिने व्यवस्थित जेवण केले. त्याचबरोबर तिच्या प्लेटलेटचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले. तिचा अशक्तपणा इतर सगळ्या तक्रारी ४ दिवसांत संपूर्ण नाहीशा झाल्या.

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# कॅन्सरग्रस्त बहिणीसाठी भावाची धावाधाव

**| पुणे : प्रतिनिधी**

घरची आर्थिक परिस्थिती एकदम बेताची, राहण्यासाठी स्वतःचे घर नाही, अशातच वडील नसल्याने आई काबाडकष्ट करून कुटुंबाचा आर्थिक गाडा चालवण्याचा प्रयत्न करत आहे. एवढ्या सर्व अडचणी असतानाच, ११ वर्षांच्या लहान बहिणीला ब्लड कॅन्सर झाल्याने संपूर्ण कुटुंबावर डोंगर कोसळला. या सर्व परिस्थितीमधून सावरत बहिणीच्या मदतीसाठी भाऊ सरसावला आहे. साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारुती मंदिर मंडळाच्या गणपतीच्या हातात राखी बांधून बहिणीला बर वाटण्यासाठी त्याने गणपतीजवळ प्रार्थना केली आहे. मंडळाच्या वतीने स्वप्नीलला बहिणीच्या उपचारासाठी ६ हजार रोख रक्कम देण्यात आली आहे. यावेळी मंडळाचे अध्यक्ष आणि नगरसेवक रवींद्र माळवदकर, भाई कात्रे, सागर नलावडे, अनिल काळे उपस्थित होते. फर्ग्युसन महाविद्यालयात शिकणारा स्वप्नील बहिणीला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. त्यासोबतच स्वप्नीलची आई मदतीचा हात मिळावा यासाठी प्रयत्न करत असून अनेक व्यक्ती व संघटनांनी मदतीचे हात पुढे केले आहे. भावा-बहिणीच्या या नात्याचा अतूट धागा कायम रहावा यासाठी स्वप्नील देवाचा धावा करत आहे. साक्षीवर सध्या कमांड हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. दर महिन्याला तिला बोनमॅरोचा खर्च करावा लागतो. तसेच दैनंदिन औषधोपचाराचाही खर्च मोठा आहे. जाधव कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती थोडी हलाखीची असल्याने त्यांना तो परवडत नाही. मध्यंतरी पैशामुळे साक्षीवरचे उपचार थांबवण्यात आले होते. परंतु सध्या काही संस्थांच्या मदतीने तिच्यावर उपचार सुरू आहेत.

# दुर्गम भागातील वैद्यकीय सेवेसाठी आराखडा : जे. पी. नड्डा

**| पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागामध्ये जाण्यासाठी ॲलोपथी डॉक्टरांसोबतच इतर विभागांतील डॉक्टरांचा सहभाग वाढावा, तसेच चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याविषयी आराखडा तयार करण्याचे काम सुरू झाली असल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी दिली. डब्ल्यूएचओच्या अहवालाप्रमाणे ४०० लोकांसाठी एक डॉक्टर आवश्यक असताना महाराष्ट्रात हे प्रमाण १३८२ लोकांना एक डॉक्टर असे आहे. यासाठी राज्य शासनाने २०२० पर्यंत राज्यातील वैद्यकीय सुविधा वाढवण्यासोबतच डॉक्टरांची संख्या वाढवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असल्याची माहिती वैद्यकीय विकास मंच आयोजित 'व्हिजन आरोग्यम-२०२०' या चर्चासत्रादरम्यान दिली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य हे बीएएमएस आणि बीएचएमएस डॉक्टरांवर अवलंबून असते. शिवाय एमबीबीएस डॉक्टरांसोबत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व बीएएमएस डॉक्टरही या सेवा ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचवत असतात. ही बाब लक्षात घेऊन अतिदुर्गम भागात वैद्यकीय सुविधा पोहोचवण्याचा प्रयत्न 'व्हिजन आरोग्यम-२०२०' केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी विकास मंचचे संयोजक डॉ. आशुतोष गुप्ता व डॉ. राजेश पांडे, डॉ. अजित गोपछडे, डॉ. राहुल हेगडे, डॉ. अशोक कुकडे, खासदार अनिल शिरोळे, आरोग्य राज्यमंत्री राम शिंदे व विविध विभागांतील वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता उपस्थित होते. नड्डा म्हणाले, ज्या ग्रामीण व दुर्गम भागात वैद्यकीय सुविधा पोहोचतच नाहीत अशा ठिकाणी किमान प्राथमिक स्तरावरील आरोग्य सुविधा पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ, औषधे व इतर वैद्यकीय सुविधा यांचा गरजेप्रमाणे समतोल राखून त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी गेली अनेक वर्षांची वैद्यकीय चौकट मोडून विचार बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. ॲलोपथीची प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांनी इतर विभागांतील डॉक्टरांना सोबत घेऊन काम केले पाहिजे. यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील उणिवा दूर होण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.


राज्यातील लोकसंख्येच्या मानाने डॉक्टरांची उपलब्ध संख्या पाहता, त्यांचे प्रमाण फारच कमी आहे. १३८२ रुग्णांमागे एक डॉक्टर उपलब्ध असल्याने चांगल्या व वेळेत वैद्यकीय सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. २०२० मधील राज्याची वाढणारी लोकसंख्या पाहता, ३ लाखांपेक्षा अधिक डॉक्टरांची गरज भासणार आहे. ती वाढवण्यासाठी, राज्यातील शेवटच्या घटकांपर्यंत चांगल्या वैद्यकीय सेवासुविधा पोहोचण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत, अशा मुद्द्यांवर 'व्हिजन आरोग्यम-२०२०' या चर्चासत्रादरम्यान संवाद साधण्यात आला.

**राज्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी जे निकष आहेत ते कमी करण्याची आवश्यकता आहे. एका महाविद्यालयासाठी किमान २५ एकर जागेची आवश्यकता असते, मात्र शहरात सध्या मोठ्या जागेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यासाठी आहे त्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारती वाढवण्याच्या दृष्टीने विचार करावा. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ॲलोपथी, आयुर्वेदिक, होमिओपथी, तसेच डेंटिस्टची भरती करणे बंधनकारक केले पाहिजे. जेणेकरून सर्व डॉक्टर वेळेवर उपलब्ध होतील. तसेच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केल्यास ते विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर ठरेल.**

**डॉ. अरुण जामकर,**
**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू**

# उद्या वीजग्राहक तक्रार निवारण दिन

**| पुणे : प्रतिनिधी**



पुणे परिमंडलातील सर्व विभागीय कार्यालयांत बुधवारी (२ सप्टेंबर) महावितरणच्या वतीने वीजग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

वीजग्राहकांच्या प्रामुख्याने वीजबील, नवीन कनेक्शन आदींसह वीजसेवेशी संबंधीत तक्रारी त्वरित निकाली काढण्यासाठी सर्व विभाग कार्यालयांत या तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. रास्तापेठ, पद्मावती, नगररोड, पर्वती, बंडगार्डन, कोथरूड, पिंपरी, भोसरी, शिवाजीनगर तसेच मंचर, राजगुरुनगर आणि मुळशी या विभाग कार्यालयांत सकाळी ११ ते दुपारी एक वाजेदरम्यान कार्यकारी अभियंता हे वीजग्राहकांनी दाखल केलेल्या तक्रारींवर सुनावणी घेतील आणि त्या निवारणासाठी तत्काळ कार्यवाही करणार आहेत. वीजग्राहकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवयव प्रत्यारोपणासाठी यंत्रणा उभारावी

**आ. राहुल कुल यांची मागणी**

**| पुणे : प्रतिनिधी**


मृत शरीरातील सुस्थितीतील अवयव काढून गरजुंना प्रत्यारोपण करण्याचा निर्णय स्वागताहार्य आहे. अवयव प्रत्यारोपणाबाबत समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा उभारावी, अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे केली आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन विकसीत शोधामुळे मानवाचे आयुर्मान वाढत चालले आहे. आपल्या समाजामध्ये सध्या जागृतीचे प्रमाण कमी असल्याने अनेकजन अवयव दान करण्यास मागे-पुढे पाहत आहेत. त्यामुळे अनकांना अवयवांची गरज असताना देखील अवयव उपलब्ध होत नसल्याने त्यांना मृत्युला सामोरे जावे लागत आहे. यासाठी नागपूर येथे झालेल्या अधिवेशनामध्ये हा मुद्दा उपस्थित करून आमदार राहुल कुल यांनी याकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्यानुसार नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अवयव प्रतिरोपण अधिनियम २०११ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती आमदार कुल यांनी दिली.

अवयव प्रत्यारोपणाबाबत समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभारावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार कुल यांनी दिली.

## शब्दनगरी

मंगळवार, ०१ सप्टेंबर २०१५ — पुण्यनगरी शब्दनगरी



### आडवे शब्द

१. भारताचा युवा द्रुतगती गोलंदाज
५. हिंद केसरी किताब पटकवणारा पुण्याचा एक पैलवान
११. लहान मुलांना टोचावयाचे ओषध
१२. देवाने पा ऋषीने चिडून उच्चारलेली वाणी
१३. पसरलेले, उथळ
१४. देवाचे नामस्मरण करताना घ्यावयाची माळ
१६. चेटूक, जादूटोणा
१७. पक्ष्यांचा समूह
१९. नाश, अधोगती
२१. औषध
२२. प्रथा, रिवाज
२४. तागडीचे चिन्ह असलेली राशी
२५. वाटणी, वितरण
२६. चक्र
२७. वादळ, तुफान
२९. बाण, तीर
३०. कृमी, किडा
३२. फुरसत, सवड
३३. घरामागील दरवाजा
३५. पाकिस्तानचा माजी क्रिकेट कप्तान- *** युनूस
३७. रंग (इंग्रजी)
३८. शेव, गाठी इत्यादीचे मिश्रण असलेला पदार्थ
३९. खाली मोठे व वर लहान अशा अनेक भांड्यांची रचना
४०. अब्रू, पत, चारित्र्य
४२. फरक, अंतर
४३. कांदा, गड्डा, रताळे
४६. जय, जीत
४७. गोष्ट, कहाणी
५०. मिश्रण, एकत्रीकरण
५३. चीज, जिन्नस
५५. मुलाचा नाव ठेवण्याचा विधी
५८. मृत, मेलेला
५९. सलमान खानची दुहेरी भूमिका असलेला करिश्मा कपूर व रंभाबरोबरचा एक चित्रपट
६०. राशी, ढीग
६१. त्वरा, धांदल
६२. वेतन, तनखा
६३. जडच्या विरुद्ध
६५. नातलग, आप्त
६७. शर्करा
६८. योग्य, नेटके
६९. गोदाम, कोठार
७१. नदीवरील लाकडी पूल
७३. मुभा, मोकळीक, सूट
७५. शेतात उगवलेले निरुपयोगी गवत
७६. अपशब्द
७७. गरजू, अडलेला
७८. अमिताभ, शशी कपूर, निरुपा रॉय, मदन पुरी यांचा एक चित्रपट

### उभे शब्द

१. घरकामे करणारी पगारी स्त्री
२. हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध गीतकार- **** जयपुरी
३. परवड, हाल
४. आण, कसम
५. परिणाम (हिंदी)
६. भारताचा राष्ट्रीय पक्षी
७. डळमळीत, अस्थिरता
८. एक प्रसिद्ध नाट्य कलावंत- *** ताम्हाणे
९. माप घेण्याचे साधन, इंचपट्टी
१०. संवेदनशील मनाचा, भावुक
१५. कैफी, अमली, नशा आणणारे
१८. वातकारक, वात निर्माण करणारे
२०. नाकाने हुंगावयाची तंबाखू
२३. दिन
२५. उत्तराधिकारी
२६. एक पालेभाजी
२७. संचार, वर्दळ
२८. फळाची साल, कवच
२९. पराभूत झाल्यामुळे आश्रय मागणे वा दयायाचना करणे
३१. तहानेमुळे शुष्क पडलेला कंठ
३२. हळुवारपणे
३३. घरात अस्ताव्यस्त पडलेल्या वस्तू
३४. हनुवटीवरील केस
३६. शोभेसाठी पाण्याचा फवारा उडविणारे यंत्र
३९. पाणी, जल
४०. शिट्टी
४१. दोन्ही तळहात जोडल्यावर झालेला खोलगट भाग, अंजली
४३. 'गँगस्टर', 'फॅशन', 'क्रिश' या चित्रपटांतील अभिनेत्री
४४. गणपतीचे वाहन, उंदीर
४५. उलट्या काळजाचा, निष्ठुर
४६. विस्मृती
४८. बाता मारणे
४९. अर्जुनाचे दुसरे नाव
५०. उत्सव
५१. पेढे, बर्फी इत्यादी गोड पदार्थ
५२. धाडसी, हिमंतवान
५४. आलेला, प्रवेश केलेला
५६. चामखीळ
५७. रक्षा, जपणूक
५९. द्यूत, पैसे लावून खेळणे
६१. प्राणावर बेतणारे, सनी देवल, मीनाक्षी शेषाद्री, अमरीश पुरी, डॅनी यांचा एक चित्रपट
६२. एक चर्मवाद्य
६३. हट्टी, दुराग्रही
६४. कुशल वा निष्णात कारागिरी करणारा माणूस
६५. फळाच्या आतील मऊ भाग, मगज
६६. साधुपुरुष, ऋषी, मुनी
६८. पाणी, जल
७०. '** तशी माती' (म्हण)
७२. तमाशातील एक नाट्य प्रकार
७३. अब्रू, प्रतिष्ठा, लौकिक
७४. नूतन, नवीन

### कालच्या शब्दनगरीचे उत्तर



# कोंढव्यात महिलांना मोफत कांद्याचे वाटप

**| कोंढवा : प्रतिनिधी**

कांद्याच्या भावाने यंदा आकाशाला गवसणी घातल्यामुळे गृहिणींच्या डोळ्यांत पाणी आले. संसारामध्ये लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तूंचे भाव सध्या कडाडले असून, घर चालविणाऱ्यांना आता रस्सीवरची कसरत करावी लागत आहे. एक हातभार व राखीची ओवाळणी म्हणून कोंढवा मनसेच्या वतीने महिलांना ११ हजार किलो कांद्याचे मोफत वाटप करण्यात आले.

कोंढवा खुर्द महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महिलांना एक राखीची अनोखी भेट म्हणून ११ हजार किलो कांद्यांचे वाटप करण्यात आले. पावसाने पाठ फिरविल्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, प्रत्येक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत.